**मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

भागवत रखमाजी जुमडे .... वादी

विरुध्द

नागसेन यशवंत पनाड व इतर ....प्रतिवादी

**तात्पुरता मनाई अर्ज नि.क्र.०५ खालील आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन प्रतिवादी क्र.७ नायब तहसीलदार लोणार यांनी रस्ता प्रकरण क्रमांक रा.प्र.क्र.एम.सी.अॅक्ट–५/१८/२०२२–२३/सुलतानपूर मध्ये दिनांक १२.१०.२०२२ रोजी दिलेला निकाल आणि प्रतिवादी क्र.८ उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी रिव्हीजन क्रमांक एम.सी.अॅक्ट–५/सुलतानपूर/१६/२०२२–२३ मध्ये दिनांक १२.०६.२०२३ रोजी दिलेल्या निकालाच्या आधारे प्रतिवादींनी वादीची जमीन गटक्रमांक ७२२ मधून रस्ता तयार करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. २३ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे.

०३. प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले नाही.

०४. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ..होकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | ..होकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ..होकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज मंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

०५. वादीने प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल करुन खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत–

०१) नायब तहसीलदार लोणार यांनी रस्ता प्रकरण क्रमांक रा.प्र.क्र. एम.सी. अॅक्ट–५/१८/२०२२–२३/सुलतानपूर मध्ये दिनांक १२.१०.२०२२ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,

०२) उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी रिव्हीजन क्रमांक एम.सी. अॅक्ट –५/सुलतानपूर/१६/२०२२–२३ मध्ये दिनांक १२.०६.२०२३ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,

०३) दिनांक २९.११.२०२२ रोजी मामलतदार कोर्टाने केलेल्या स्थळ निरीक्षण पंचनामा व सोबत नकाशाची प्रत,

०४) सहाय्यक अभियंता पाटबंधारे विभाग मेहकर यांनी दिनांक ११.१०.२०२२ रोजी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बुलढाणा यांना दिलेले पत्र

०५) सहाय्यक अभियंता पाटबंधारे विभाग मेहकर यांनी दिनांक ११.१०.२०२२ रोजी तहसीलदार लोणार यांना दिलेले पत्र

०६) मौजे सुलतानपूरच्या गाव नकाशा व गटनकाशाच्या प्रती,
०७) दिनांक ०३.१०.२०२२ रोजीचा स्थळ निरीक्षण अहवाल नकाशासह,
०८) मंडळ अधिकारी सुलतानपूर यांनी उपविभागीय अधिकारी मेहकर यांना दिनांक १०.०२.२०२३ रोजी नकाशासह पाठवून दिलेली स्थळ निरीक्षण टिप्पणी/ अहवालाची प्रत,
०९) श्री. दिगांबर माणिकराव सुरुशे, गजानन सखाराम जुमडे यांचे शपथपत्राच्या प्रती,

०६. प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कथनाच्या पृष्ठयर्थ कागदपत्र यादी नि.क्र. २५ सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत

०१) गटक्रमांक ५११ व ७२२ चा गटनकाशा,
०२) ग्रामपंचायत सुलतानपूर येथील कामकाजाबाबतची प्रत,
०३) ग्रामपंचायत सुलतानपूर यांनी मिळकत क्रमांक १३६५ च्या दिलेल्या उता–याची प्रत,
०४) ग्रामपंचायत सुलतानपूर यांनी दिनांक १०.०९.२०२२ रोजी वादीस पाठवून दिलेल्या नोटीसची प्रत,
०५) दिनांक २८.११.२०२२ रोजीच्या पंचनाम्याची प्रत,
०६) मोजणी संदर्भात उप अधीक्षक भूमी अभिलेख लोणार यांनी तहसीलदारांना पाठवून दिलेले पत्र
०७) ग्रामविकास अधिकारी यांनी दिनांक ०६.०९.२०२२ रोजी तहसीलदार लोणार यांना पाठवून दिलेले पत्र

०७. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>–**

०८. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. मौजे सुलतानपूर ता. मेहकर येथील गटक्रमांक ७२२ पैकी ५४ आर जमीन वादीने दिनांक २९.०६.१९९३ रोजी नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी घेतलली आहे. सदरची वस्तुस्थिती प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी नाकारलेली नाही.

प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी मामलतदार कोर्टात दिनांक १६.०९.२०२२ रोजी अर्ज दाखल करुन त्यांची जमीन गटक्रमांक ६०३, ६०५ व ६०६ मध्ये जाणे येणे करिता असलेला वहिवाटी रस्ता वादीने अतिक्रमण करुन बंद केलेला रस्ता खुला होवून मिळण्याची मागणी केलेली होती. मामलतदार कोर्टाने स्थळ निरीक्षणाच्या आधारे प्रतिवादींनी दाखल केलेला वर नमूद अर्ज मंजूर केला. उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी देखील मामलतदार कोर्टाने दिलेला निकाल कायम ठेवला.

०९. मामलतदार कोर्टाने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन तसेच उपलब्ध कागदोपत्री पुराव्याच्या आधारे निकाल दिलेला आहे काय ? याची प्राथमिक शहानिशा करणे आवश्यक आहे. मामलतदार कोर्टाने दिलेल्या निकालाचे अवलोकन केले असता गटक्रमांक ६०३,६०५,६०६ या गटात प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या नावे जमिनी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार गटक्रमांक ५११ व ७२२ मधून मरीमाय मंदिरा समोरुन जाणा–या पांदण रस्त्यावर वादीने अतिक्रमण करुन वहिवाटी रस्ता बंद केलेला आहे. पुढे मामलतदार कोर्टाने दिलेल्या निकालातील निष्कर्षावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, मरीमाय मंदिर/देवस्थान अस्तित्वात असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. दिनांक २९.११.२०२२ रोजी तहसीलदार लोणार यांनी केलेला स्थळ निरीक्षण पंचनाम्याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गटक्रमांक ५११ व ७२२ यामधून कोणताही वहिवाटी रस्ता अस्तित्वात नसून याउलट, गटक्रमांक ५११ च्या उत्तरेस असलेल्या कोराडी कालव्यावरुन पूर्व–पश्चिम दिशेने शेतक–यांना जाण्या येण्यासाठी वहिवाटी रस्ता

उपलब्ध आहे. निश्चितच मामलतदार कोर्टाने वरील बाबींचा निकाल देतेवेळेस विचार केलेला नाही असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१०. "गोरक्षण संस्थान, मूर्तिजापूर – विरुध्द – महाराष्ट्र शासन व इतर " रीट पिटीशन क्रमांक १९८२ /२०१७ मध्ये दिनांक २५.०४.२०१९ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या न्यायनिवाडयातील निष्कर्षानुसार मामलतदार कोर्ट अॅक्ट चे कलम ५ अनुसार वहिवाट दावा दाखल करतांना कलम ७ मधील तरतुदीनुसार वहिवाट दाव्यात संबंधीत पक्षकारांच्या जमिनीचा संपूर्ण तपशील चतुःसीमेसह तसेच वादग्रस्त रस्त्याचा तपशील नमूद करणे तसेच वादपत्रासोबत संबंधीत वादीने स्वतःचे शपथपत्र / सत्यापन जोडणे अनिवार्य आहे. मा. न्यायमूर्तीनी नोंदविलेल्या निष्कर्षाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ याने मामलतदार कोर्ट अॅक्टचे कलम ५ अनुसार तसा अर्ज मामलतदार न्यायालयात दाखल केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास येते की मामलतदार कोर्ट अॅक्टचे कलम ९, १० व ११ मधील महत्वाच्या बाबींची देखील पूर्तता संबंधीत मामलतदार न्यायालयाने केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी दिनांक १६.०९.२०२२ रोजी दिलेल्या अर्जात कोणत्या तारखेस अर्ज दाखल करण्यास कारण घडले, त्याचा उल्लेख केलेला नाही. तसेच वादग्रस्त रस्त्या व्यतिरिक्त प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना दुसरा सोईस्कर रस्ता उपलब्ध नाही, असा मजकूर दिनांक १६.०९.२०२२ रोजीच्या अर्जात नमूद केलेला नाही. प्रथमदर्शनी न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी मामलतदार कोर्ट अॅक्ट मधील महत्वाच्या तरतुदींची पूर्तता करुन निकाल दिलेला नाही. सबब,

प्रस्तुत अर्ज मंजूर न केल्यास प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या आदेशाची अंमलबजावणी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसे झाल्यास निश्चितच वादीच्या जमिनीचे नुकसान होणार आहे. न्यायालयात दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादीच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी रस्ता प्रकरण क्रमांक रा.प्र.क्र.एम.सी.अॅक्ट–५/१८/२०२२–२३/सुलतानपूर मध्ये दिनांक १२.१०.२०२२ रोजी दिलेला निकाल आणि प्रतिवादी क्र.८ उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी रिव्हीजन क्रमांक एम.सी.अॅक्ट–५/सुलतानपूर/१६/२०२२–२३ मध्ये दिनांक १२.०६.२०२३ रोजी दिलेल्या निकालाप्रमाणे अंमलबजावणी करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

३. सदरचा दावा आजपासून सहा (०६) महिन्याच्या आत निकाली काढणे कामी उभयपक्षांनी आपापला तोंडी व कागदोपत्री पुरावा नेमलेल्या तारखेस सादर करावा.

४. खर्चाबाबत हुकूम नाही.

SHAIKH ABDULKARIM A
Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2023.10.19 12:01:12 +0530

(अ.अ.शेख)

दिनांक: १७.१०.२०२३

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
मेहकर.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 17.10.2023
Date of Uploading : 18.10.2023